सीमावाद : भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील एक आव्हान

(विशेष संदर्भ : भारत-पाकिस्तान, भारत-चीन, भारत-बांग्लादेश)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

तुळशीदास हुलप्पा म्हेत्रे

एम.ए., बी.एड. (राज्यशास्त्र)

सहशिक्षक

स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, शिरूर ताजबंद

ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दयानंद माधवराव गुडेवार

एम.ए., बी.एड, एम.फिल, नेट, पीएच.डी.

राज्यशास्त्र विभागप्रमुख

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता.जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

सप्टेंबर २०२२

सीमावाद : भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील एक आव्हान

(विशेष संदर्भ : भारत-पाकिस्तान, भारत-चीन, भारत-बांग्लादेश)

प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्यानंतर सीमावाद हा प्रमुख प्रश्न बनला आहे. तरीही भारताने शेजारी राष्ट्रांशी सहकार्य, समन्वय आणि विश्वासाचे संबंध निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्याचे दिसून येते. तरीसुद्धा भारताला १९४७, १९६२, १९६५, १९७१, १९९९ असे पाच युद्ध करावे लागले. १९६२ चा अपवाद वगळता पाकिस्तान बरोबरच्या युद्धात भारताचा विजय झाला असला तरी मोठ्या प्रमाणात वित्तहानी व मनुष्यहानी झाली. भारताच्या विकासावर होणारा खर्च युद्ध आणि संरक्षणावर होणे विकसनशील भारताला परवडणारे नाही. सीमा संघर्षामुळे देशा-देशातील व्यापारी संबंध बिघडत असतात. त्याचाच परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येतो. अलिकडे चीनकडून सिमाउल्लंघन मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचबरोबर पाकपुरस्कृत दहशतवादाचा मोठा प्रश्न भारतासमोर आहे. यावर समाधानकारक उत्तर अद्यापही शोधता आले नाही.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अगदी प्राचीन काळात सीमावादावरून संघर्ष निर्माण होत होते. कोणत्याही प्राचीन राज्याच्या सीमा या निश्चित नव्हत्या. राजकीय व्यवस्थेतील केंद्रीय शक्ती कमजोर झाली की, राज्याचा आकार कमी होत असे. पर्यायी सीमा बदलल्या जात होत्या. भारतातील सत्ताकेंद्रामध्ये परस्पर संघर्ष असले तरी विविध सत्ताकेंद्रानी अनेक प्रसंगी एकत्र येऊन बाहेरून होणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे धोरण स्वीकारून आपल्या हितसंबंधाचे रक्षण केलेले आहे. इराण व मध्य आशियातील राजकीय सत्ता जेव्हा आक्रमणाच्या लाटेत नामशेष झाल्या तेव्हा भारतावरही आक्रमणे झाली. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत मध्य आशियातील शांततेचा संबंध भारताशी आहे. तरी प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात विदेशाशी सीमा संघर्ष अभावानेच दिसून येतो. भारतीय उपखंडाच्या भू-राजकीय रचनेचा सीमासंघर्ष, परराष्ट्र नीती व आंतरराष्ट्रीय राजकारणातील सहभाग इत्यादी भूमिकेशी अत्यंत निकटचा संबंध आहे. पूर्वेकडील प्रदेशातील घनदाट अरण्य, उत्तरेकडील हिमालयाच्या उत्तुंग रांगा आणि पश्चिमेकडील डोंगराळ अनुत्पादक

प्रदेश व बंडखोर प्रवृत्तीचे लोक, दक्षिणेकडील महासागर इत्यादी कारणांमुळे भारतीय उपखंडातील सत्ताकेंद्रांना भारताबाहेर सुरू असलेल्या सत्तास्पर्धेत फारसे स्वारस्य नव्हते. परंतु मोगल कालखंडात भारतात एककेंद्रित सत्ता निर्माण झाल्यानंतर इराण व मध्य आशियातील केंद्रावर वचक ठेवणे, भारताच्या पश्चिम सीमेच्या रक्षणासाठी अफगाणिस्तानवर लक्ष्य केंद्रित करणे ही मोगल सम्राटाच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टये होती.

आधुनिक भारताच्या सीमा धोरणाला ब्रिटिश कालखंडात निश्चित आकार प्राप्त झाला. भारतीय उपखंडावर आपले अधिपत्य प्रस्थापित करून व्यापारी सत्तेचा विकास करणे तत्कालीन ब्रिटिश सत्तेचे मुख्य धोरण होते. ब्रिटिशांचे चीन, मध्य आशिया आणि पाश्चिमात्य राष्ट्रांसोबतचे संबंध व्यापाराशी निगडित होते. व्यापारी हितसंबंधाला धोका निर्माण होऊ नये म्हणून राजकीय वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ब्रिटिश भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने इराण, अरब राष्ट्रे, तिबेट व अफगाणिस्तान अशा तटस्थ राष्ट्रांचे कडे निर्माण केले. एका बाजूला भारताच्या मर्यादा बगदाद व दमास्का यांच्या दरम्यान असलेले अफगाणिस्तानचे वाळवंट होते तर दुसरीकडे इंडोनेशियापासून चीनपर्यंतचा विस्तृत भूप्रदेश होता. हे ब्रिटिशांचे भारतीय सीमा धोरण त्यांच्या व्यापारी हितसंबंधाशी निगडित होते.

स्वातंत्र्यानंतर भारताला काही दिवसांतच सीमा संघर्षाचा सामना करावा लागला. पाकिस्तानने काश्मीर प्रश्नामुळे भारतावर आक्रमण केले. ब्रिटिश चीन आणि तिबेट यांनी एकत्र येऊन तयार केलेली भारत मॅकमोहन रेषा चीनने अमान्य करून १९६२ ला भारतावर आक्रमण केले. १९७१ मध्ये भारताच्या सहकार्याने बांग्लादेश निर्माण करण्यात आला असला तरी भारत-बांग्लादेशाचा सीमा प्रश्न अद्यापही संपलेला दिसत नाही. शांतता, सहकार्य, समन्वय, सहजीवन आणि आंतरराष्ट्रीयवाद ही तत्त्वे भारतीय परराष्ट्र धोरणाचे आधारस्तंभ राहिले आहेत. श्रीलंकेतील वांशिक संघर्ष, नेपाळ, अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांग्लादेश यांच्यातील अंतर्गत संघर्ष नाहीसा करून तेथे लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी भारताने वेळोवेळी प्रयत्न केले. तरी शेजारील राष्ट्र भारताच्या या धोरणाकडे सातत्याने अविश्वासाने पाहतात. आशिया खंडातील एक बलाढ्य राष्ट्र म्हणून भारताच्या परराष्ट्र धोरणाचे हे अपयश आहे. आशिया खंडात शांतता असल्याशिवाय भारताला आपली प्रगती

करता येत नाही. सीमाप्रश्न किंवा शेजारी राष्ट्राशी संबंध हे परराष्ट्र धोरणाद्वारे निर्धारित केले जातात.

परराष्ट्र धोरण म्हणजे एखाद्या विशिष्ट राज्याने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भात स्वीकारलेली समग्रवादी भूमिका आणि विशिष्ट राज्याशी असलेली किंवा निर्धारित करावयाचे विशिष्ट संबंध या विषयाची भूमिका होय. तसेच स्वतःचे हितसंबंध व त्यांच्या पुरस्कारासाठी निश्‍चित केलेले तत्त्वे, कार्यक्रम, उद्दिष्टे याविषयी त्या राज्यांनी स्वीकारलेली भूमिका म्हणजे परराष्ट्र धोरण होय. अर्थात परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हित साध्य करण्याचे एक साधन आहे. तसेच सीमा धोरण ठरविणे, सीमा प्रश्न सोडविणे, शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे ही महत्त्वाची कार्ये परराष्ट्र धोरणाद्वारे केली जातात.

भारत-पाकिस्तान, भारत-चीन यांच्यातील सीमावाद हे आशिया खंडातील शांतता भंग होण्यास कारणीभूत आहेत. एवढेच नाही तर त्या संघर्षातून जागतिक संघर्षाची सुरुवात होऊ शकते. कारण भारत, पाकिस्तान, चीन जागतिक राजकारणातील प्रभावशाली राष्ट्रे आहेत हे नाकारता येत नाही. जागतिक शांततेसाठी या राष्ट्रांचे सीमा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. यासाठी भारतीय सीमा धोरणाच्या पुनर्मूल्यांकनाची आवश्यकता जाणवते. बांग्लादेशातून भारतात होणारी सततची घुसखोरी, पाकिस्तानकडून होणाऱ्या दहशतवादी कारवाया आणि चीनकडून होणारे नियमित सिमाउल्लंघन यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील आव्हान वाढले आहे. भारतीय विकास प्रक्रियेतील ही प्रमुख आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय समस्या अधोरेखित करून संशोधनासाठी “सीमावाद : भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील एक आव्हान (विशेष संदर्भ : भारत-पाकिस्तान, भारत-चीन, भारत-बांग्लादेश)” या विषयाची निवड केली आहे.

संशोधन विषयाची निवड

भारताला स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात सतत सीमा संघर्षाला सामोरे जावे लागले आहे. ब्रिटिश कालखंडात भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने ब्रिटिशांनी नेपाळ, तिबेट, अफगाणिस्तान, श्रीलंका अशा छोट्या राष्ट्रांचे प्रहार प्रतिबंधक राष्ट्राचे कडे निर्माण केले होते. स्वातंत्र्योत्तर भारताला ब्रिटिश संरक्षण नीती कायम ठेवता आली नाही. त्यामुळे शेजारी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्यात भारताच्या परराष्ट्र धोरणाला अपयश आले. शेजारी राष्ट्रांच्या परस्परविरोधी भूमिकेमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर सीमावाद

एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. भारत-चीन, भारत-नेपाळ, भारत-बांग्लादेश या सर्व राष्ट्रांसोबत सीमा संघर्ष असलेले दिसतात.

सततच्या सीमा संघर्षामुळे राष्ट्रांतर्गत शांतता आणि राष्ट्र विकासावर परिणाम होत असतो. असे मान्य केल्यास भारतीय परराष्ट्र धोरणात सीमावादाच्या संदर्भात काही महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत का? सीमावादाचा भारताच्या शेजारील राष्ट्रांबरोबरच्या व्यापारी संबंधावर काही परिणाम होतो का? भारताचा सीमाप्रश्न एक जागतिक समस्या बनली आहे का? जागतिक राजकारणावर सीमावादाचा परिणाम होतो का? या व अशा अनेक प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्यासाठी "सीमावाद : भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील एक आव्हान (विशेष संदर्भ : भारत-पाकिस्तान, भारत-चीन, भारत-बांग्लादेश)" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) भारत-पाकिस्तान यांच्यातील सीमा प्रश्नांचा अभ्यास करणे आणि उभय राष्ट्रातील नियमित संघर्षाचा शोध घेणे.

२) भारत-चीन यांच्यातील सीमा प्रश्नाचा अभ्यास करणे.

३) भारत-बांग्लादेश यांच्यातील सीमा प्रश्नाचे अध्ययन करणे.

४) काश्मीर प्रश्न आणि तिबेट प्रश्नातील महासत्तांच्या भूमिकेचा शोध घेणे.

५) भारताच्या सीमाप्रश्नाचा भारतीय अर्थव्यवस्था व भारताच्या विकासावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.

संशोधनाची गृहितके

१) शेजारी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्मितीत सीमावाद एक प्रमुख समस्या बनली असून सीमाप्रश्न सोडविण्यात भारतीय परराष्ट्र धोरणाला अपयश आले आहे.

२) भारत-पाकिस्तान यांच्यातील प्रमुख सीमाप्रश्न काश्मीर असून पाकव्याप्त काश्मीर भारतात विलीन केल्याशिवाय भारत-पाकिस्तान यांच्यात शांतता निर्माण होणार नाही.

३) भारत-चीन यांच्यातील सीमावादाचे प्रमुख कारण तिबेट प्रश्न असून तिबेटच्या स्वातंत्र्यासाठी भारताकडून आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरेसे प्रयत्न झालेले नाहीत.

४) भारत-बांग्लादेश यांच्यातील सीमाप्रश्न सोडविण्यात भारतीय परराष्ट्र धोरणाला यश आले असून बांग्लादेशमधील रोहिंग्या जमातीच्या निर्वासितांचा प्रश्न मानवतेच्या आधारे सोडवला जाऊ शकतो.

५) सीमा संघर्षामुळे भारताच्या आर्थिक विकासावर आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर नकारात्मक परिणाम होत आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

कोणत्याही विषयावर संशोधन करण्यापूर्वी संशोधन साहित्याचा आढावा घेणे आवश्यक असते. एखाद्या विषयावर पूर्व संशोधन झाले असेल तर त्यातील पुन्हा पुन्हा येणाऱ्या बाबी टाळता येतात. तसेच पूर्व संशोधन हे संशोधनाला निश्चित दिशा देण्याचे काम करीत असते. सीमावाद आणि भारतीय परराष्ट्र धोरणासंदर्भात विविध विद्यापीठात खालील काही संशोधने झालेली आहेत.

१) अरविंद कुमार सिंग यांनी २०२० मध्ये "भारत-बांग्लादेश संबंध एक विश्लेषणात्मक अभ्यास" या विषयावर वी.बी.एस. पूर्वांचल युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश या विद्यापीठातून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

२) उपाध्याय देवेंद्र यांनी १९९४ मध्ये "भारत-पाकिस्तान संबंध" या विषयावर सिंध चंद्रा मुळी यांच्या मार्गदर्शनाखाली वीर बहादूर सिंह पूर्वांचल युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश या विद्यापीठातून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

३) जय सिंह यांनी २०११ मध्ये "काश्मीर समस्या बदलते विशेष संदर्भ" या विषयावर अजय सिंग यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली वीर बहादूर सिंह पूर्वांचल युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश या विद्यापीठातून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

४) राजेश कुमार सिंह यांनी २००२ मध्ये "भारतीय विदेश नीति और गट निरपेक्षता दक्षिण आशिया के विशेष संदर्भ में" या विषयावर मंगला प्रसाद सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली वीर बहादूर सिंह पूर्वांचल युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश या विद्यापीठातून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

५) खरात वसंत आबासाहेब यांनी २०१९ मध्ये "काश्मीर समस्या, स्वरूप आणि व्याप्ती संभाव्यता" या विषयावर अफाक खान यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी

रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठातून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

६) महादेव हरिदास गव्हाणे यांनी "भारत-पाकिस्तान संबंध विशेष संदर्भ काश्मीर प्रश्न" या विषयावर भूषणकुमार जोरगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठातून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

७) लांडगे विजय वामनराव यांनी २०१९ मध्ये "भारत-बांग्लादेश संबंधाचा एक चिकित्सक अभ्यास" या विषयावर इंगोले आदिनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठातून संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

"सीमावाद : भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील एक आव्हान (विशेष संदर्भ : भारत-पाकिस्तान, भारत-चीन, भारत-बांग्लादेश)" यासंदर्भात कोणतेही संशोधन कार्य झाल्याचे आढळले नाही म्हणून संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन विषय भारत देशाचे संरक्षण व राजकीय निर्णय प्रक्रिया यांच्याशी संबंधित असल्यामुळे तथ्यांचे संकलन करण्यासाठी सामाजिक शास्त्राच्या संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या अभ्यास पद्धतींपैकी ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी द्वितीय स्रोतांचा वापर केला जाणार आहे. त्यात प्रामुख्याने दैनंदिन पत्रे, संशोधन संस्थेचे अहवाल, आंतरराष्ट्रीय संघटनेचे अहवाल, विविध आयोग, परिषदा व समित्यांचे अहवाल, ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, वार्षिक अंक इत्यादी तसेच अप्रकाशित शासकीय रेकॉर्ड, दुर्मीळ प्रलेख, संशोधन अहवाल इत्यादी स्रोतांचा वापर संशोधनात करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधन भारतीय सीमावादावर भाष्य करीत असले तरी संशोधनाचा मुख्य विषय भारत-पाकिस्तान, भारत-चीन, भारत-बांग्लीदेश सीमासंघर्ष इत्यादींपुरते मर्यादित आहे.

संशोधनाचे महत्त्व

प्रस्तुत संशोधनातून भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये, वैशिष्ट्ये, परराष्ट्र धोरणातील बदल आणि सातत्याचे सखोल अध्ययन करण्यात येणार आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाची जाणीव होण्यास संशोधन उपयुक्त ठरते. जागतिक सीमावाद संशोधनात पाकिस्तान, चीन, बांग्लादेश या भारताच्या शेजारील राष्ट्रांशी असलेल्या सीमावादाचा अभ्यास करण्यात येणार आहे. सीमावादाची कारणमीमांसा समजून घेण्यास प्रशासकीय अधिकारी आणि राज्यकर्त्यांना संशोधनाची मदत होऊ शकते आणि संशोधन महत्त्वपूर्ण ठरू शकते. सततचे सीमासंघर्ष हे जागतिक शांतता आणि मानवाधिकारासमोरील एक आव्हान बनले आहे. या विषयात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे माझे संशोधन कार्य मार्गदर्शक ठरू शकत यात मला कोणतीही शंका नाही.

संशोधन आराखडा

प्रकरण पहिले- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयप्रवेश, संशोधन समस्या, संशोधन उद्दिष्ट्ये, संशोधन गृहितके, संशोधन व्याप्ती, संशोधन महत्त्व, संशोधन मर्यादा, संशोधन पद्धती, तथ्य संकलन पद्धती, संशोधन आराखडा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - भारतीय परराष्ट्र धोरण आणि सीमावाद

प्रस्तुत प्रकरणामध्ये परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या, भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये, निर्धारक घटक, वैशिष्ट्ये, अडचणी, भारतीय सीमावादाची कारणे, सीमावादाचा राष्ट्रीय हितसंबंधांवर होणारा परिणाम इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - भारत-पाकिस्तान सीमावाद

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारत-पाकिस्तान सीमावादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सीमावादाची कारणे, सीमावाद संदर्भात भारताचे धोरण, सीमावाद संदर्भात पाकिस्तानची भूमिका, सीमावादाबाबत पाश्चिमात्य राष्ट्रांची भूमिका, सीमावादामुळे भारतीय परराष्ट्र धोरणावर होणारे परिणाम, सीमावादावरील उपाय इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - भारत-चीन सीमावाद

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारत-चीन सीमावादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सीमावादाची कारणे, सीमावादासंदर्भात भारताचे धोरण, सीमावादासंदर्भात चीनची भूमिका, सीमावादाबाबत पाश्चिमात्य राष्ट्रांची भूमिका, चीन सीमावादामुळे भारतीय परराष्ट्र धोरणावर होणारे परिणाम, सीमावादावरील उपाय इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे - भारत-बांग्लादेश सीमावाद

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारत-बांग्लादेश सीमावादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सीमावादाची कारणे, सीमावादासंदर्भात भारताचे धोरण, सीमावादासंदर्भात बांग्लादेशाची भूमिका, सीमावादाबाबत पाश्चिमात्य राष्ट्रांची भूमिका, बांग्लादेश सीमावादामुळे भारतीय परराष्ट्र धोरणावर होणारे परिणाम, सीमावादावरील उपाय इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - सारांश आणि निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये सारांश व संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षाची मांडणी करून शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भ

१) बाचल वि.मा., १९७८, भारताचे परराष्ट्र धोरण, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे

२) दिवाण चंद्रशेखर, १९९२, भारताची विदेश नीती, विद्या प्रकाशन, नागपूर

३) दुभाषी पद्माकर, २००३, भारताचे परराष्ट्र धोरण, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

४) देवळाणकर शैलेंद्र, २००५, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख प्रश्न, विद्या प्रकाशन, औरंगाबाद

५) देवळाणकर शैलेंद्र, २००७, भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतरे, प्रतिमा प्रकाशन, पुणे

६) नाईकवाडे अशोक, १९९५, भारताचे परराष्ट्र धोरण, स्टडी सर्कल, मुंबई

७) पळशीकर सुहास, २००४, समकालीन भारतीय राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे

८) डॉ.आर.डी. साबळे, १९९८, भारताचे परराष्ट्र धोरण, कल्पना प्रकाशन, नांदेड

९) वैद्य अरविंद, २००९, अमेरिकेचे परराष्ट्र धोरण, सायंटिफिक स्पेशालिस्ट एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई

१०) लोटे ज.रा., १९९५, भारताची विदेश नीती, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

११) Bhattacharya D.C., 1971, An Outline of World Politics, Vijaya Publishing House, Baroda

१२) Kaul T.N., 2000, India's and the New World Order, Gyan Publication House, New Delhi

१३) Tunambkar S.V., 1948, The Foreign Policy of Indian Union, Padmaji Publications, Baroda

१४) Nanda B.R., 1976, India's Foreign Policy the Nehru Years, Vikas Publication, New Delhi

संशोधक

तुळशीदास हुलप्पा म्हेत्रे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार
राज्यशास्त्र विभागप्रमुख
उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी
ता.जळकोट जि.लातूर